गोवादूत : पणजी - शनिवार,२ जानेवारी २०१६

# मदत घेण्यापेक्षा देण्याचा आनंद अवर्णनीय

## आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजसेविका नसिमा हुरजूक यांचे प्रतिपादन

दोडामार्ग, दि. १ (प्रतिनिधी)

समाजात अपंगांबरोबरच अनेक दुर्बल घटक अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. या घटकांसाठी सर्वांनी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. आपल्याबरोबरच्या दुर्बल घटकांना पुढे घेऊन गेले तरच आपला उत्कर्ष होईल. दुर्बलांसाठी काम करणा-या अनेक सेवाभावी संस्थांना मदत करताना, ती घेण्यापेक्षा देण्याचा आनंद हा अवर्णनीय असतो असे विचार आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजसेविका व हेल्पर्स ऑफ दि हॅडीकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती नसिमा हुरजूक यांनी मांडले.

त्या येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्यावतीने 'लेक लाडकी' अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनी व त्यांच्या आई अर्थात मायलेकींच्या स्नेहमेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या मुलींनी केले होते. मान्यवरांच्या हस्ते




एका महिला उद्योजकाचा सत्कार करताना नसिमा हुरजूक.

दीप प्रज्वलनाने व सावित्रीबाई फुले व लक्ष्मीबाई हळबे यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यापुढे म्हणाल्या की, अपंगत्वाचा ठसा मिटविण्यासाठी त्यांना स्वावलंबी बनविले पाहिजे. त्यासाठी त्यांच्या स्वतंत्र शाळा हव्यात. कारण सर्वसाधारण मुलांच्या शाळेत त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. मी स्वत: ते अनुभवले आहे.

कधी कधी जेव्हा माणसाला खरी गरज असते तेव्हा कोणीही मदत करत नाही. पण जेव्हा गरज नसते तेव्हा हजारो हात पुढे येतात. तेव्हा योग्य वेळी त्यांना मदत केली पाहिजे. आपल्या संस्थेतील अनेक उपक्रमांची त्यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितलेल्या अनेक आठवणींनी विद्यार्थ्यांना अश्रू आवरता आले नाहीत. त्यांनी वृद्धाश्रम काढण्याचे स्वप्न बोलून दाखविले.

यावेळी त्यांच्या जीवन प्रवासावर व कार्यावर आधारित लघुपट दाखविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी महाविद्यालयाने राबविलेल्या नवनवीन उपक्रमांची माहिती देऊन महिला विकास कक्षाच्या स्थापनेमागील उद्दिष्टे कथन केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभाग प्रमुख आर. एस. इंगळे, किरण नाईक तसेच सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण नाईक तर आभार कु. पोर्णिमा वराडकर हिने मानले.

नसिमा हुरजूक यांच्या हेल्पर्स ऑफ दि हँडीकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेला विद्यार्थिनींनी जमा कलेल्या भाऊबीज निधीतून ५००० रु. चा धनादेश विद्यार्थिनींच्या हस्ते दिला. सुजल सूर्यकांत गवस यांनी ही २००० रु. ची आर्थिक मदत दिली. प्राचार्यांच्या हस्ते नसिमा हुरजूक यांचा श्रीफळ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे स्थानिक सदस्य विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर उपस्थित होते.

यावेळी एकच कन्या प्राप्तीनंतर कुटुंबनियोजन करणा-या तालुक्यातील माधुरी सावंत, वसुंधरा गवस, वैशाली गवस यांचा, स्वावलंबी अपंग कु. संगीता राऊळ हिचा, कर्तबगार स्त्रिया माधवी मणेरकर, सौ. सुजल सूर्यकांत गवस तसेच युवती स्वयं निर्भर निधी अर्थात भाऊबीज निधी जास्त संकलन करणा-या विद्यार्थिनी कु. प्रज्ञा शिरोडकर व कु. ज्योती जाधव व महाविद्यालयाच्या वरिष्ठ लिपिक सौ. किरण नाईक या सर्वांचा पुष्पगुच्छ देऊन नसिमा हुरजूक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.